# दोन (महा) सत्ता पालट

## चंद्रशेखर पुरंदरे

अमेरिका या (मावळत्या) महासत्तेची अध्यक्षीय निवडणूक नोव्हेंबरमध्ये झाली आणि बराक ओबामा पुन्हा निवडून आले. चीनमध्ये सत्तेचे शिखर असणाऱ्या पॉलिट-ब्यूरोची दहा वर्षांनी पुनर्रचना झाली व नवीन अध्यक्षही नियुक्त झाला. मात्र दोन्ही सत्तापालटांनी जागतिक राजकारण, अर्थकारण व समाजकारण यात श्रेयस्कर दिशेने बदल होईल असे वाटत नाही.

अमेरिका अजूनही महासत्ता असल्याचा पहिला भ्रम आणि निवडणुका म्हणजे लोकशाही हा दुसरा भ्रम टिकवण्याचे प्रसारमाध्यमांचे हितसंबंध, त्यासाठी संशयास्पद सर्वेक्षणे, 'तज्ज्ञां'च्या चर्चा या योगे अमेरिकेतील निवडणूक प्रसारमाध्यमांनी तापवली व चुरशीची केली.

या निवडणुकीकडे दोन प्रकारे पहाता येईल. एक - या देशांतर्गत काय फरक पडेल; दोन - बाहेरच्या जगावर काय परिणाम होतील.

अमेरिकन अर्थकारणाच्या संदर्भात त्या देशाची दिवाळखोरीकडे वाटचाल वेग घेत आहे. बेरोजगारी कमी होत नाही. कर्जबाजारीपणाही तेवढाच आहे. आर्थिक वाढीला वेग नाही. राजकारणाच्या संदर्भात या निवडणुकीतील दोन्ही उमेदवारांच्या अपप्रचाराने ओबामांचा डेमोक्रॅटिक पक्ष व विरोधी रिपब्लिकन पक्ष यांच्यातील दुही वैरापर्यंत आलेली आहे. तेथील लोकसभा-राज्यसभा सदृश संस्थांत एकात एका पक्षाला बहुमत आहे तर दुसऱ्यात दुसऱ्याला. त्यामुळे राष्ट्रीय धोरण ठरवण्याच्या बाबत - विशेषत: अतिश्रीमंतांवरील करमर्यादा वाढवण्याबाबत - परिस्थिती निवडणुकीपूर्वी होती तशीच राहणार. समाजकारणाच्या संदर्भात परिस्थिती जरा बरी आहे. दोन प्रमुख धोरणे ओबामांनी पहिल्या कारकीर्दीत राबवली. एक तर प्रत्येक अमेरिकनाला आरोग्य सुरक्षा मिळावी असा प्रयत्न सुरू केला. दुसरे म्हणजे, समाजाच्या परिघावरच्या गटांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. ते म्हणजे, भिन्नवंशीय लॅटिन अमेरिकन, कृष्णवर्णीय, समलिंगी, गर्भपात कायदेशीर असावा या विचाराचे लोक व स्त्रिया. त्यामुळे या गटांनी ओबामांना मतदान केले व निवडणुकीतील विजय तेथेच नक्की झाला. पण त्याचबरोबर गोरा आहे-रे गट रिपब्लिकनांचा व बाकीचे डेमोक्रॅटिक ही तीव्र विभागणी व्यापक समाजहिताच्या दृष्टीने अनिष्ट दिशेला जाणार.

जगाच्या दृष्टीने या पुनर्निवाचनाचा सकारात्मक परिणाम होईल असे वाटत नाही. चार वर्षांपूर्वीचा जमिनीपासून चार अंगुले वर चालणारा ओबामांचा धर्मराजाचा रथ आता जमिनीवर तर आलाच पण त्याच युद्धभूमीवरील कर्णाच्या रथाप्रमाणे रुतल्यासारखा झाला आहे. अध्यक्षीय बाहुले नाचवणारी भांडवलशाही, लष्कर-उद्योग ही अभद्र युती आणि महासत्ता पद हांहां म्हणता निसटून जात आहे याचा विषाद - यामुळे परराष्ट्रीय धोरण जागतिक दुबळ्या स्तरांना सहानुभूत राहणे कठीण आहे. त्याचबरोबर ते अमेरिकेचे हितसंबंधही सुरक्षित ठेवेल याची शंका वाटते. किंबहुना अमेरिकेला असणारा मुस्लीम आतंकवादाचा धोकाच वाढलेला दिसतो. प्रथम अफगाणिस्तान. तेथील अमेरिकन सैन्यात 'परिस्थिती काबूत' आणण्याच्या सबबीने ओबामांनी सत्तेवर येताच प्रचंड भर केली. परिस्थिती काबूत आली नाही आणि दुष्मनी मात्र वाढली. दुसरा पाकिस्तान. स्वयंचलित विमानांनी दहशतवादी टिपण्याच्या धोरणाने पाकिस्तानी जनमत अधिकाधिक अमेरिकाविरोधी होत आहे. मध्यपूर्वेतील अरब वसंताने अमेरिकेची चांगलीच पंचाईत झाली. आजवर जोपासलेले हुकूमशहा (गडाफी सोडता) जनक्षोभामुळे धडाधड कोसळले. ज्या लोकशाहीचा नारा अमेरिका लावते, तीच लोकशाही हवी असे तद्देशीय म्हणू लागल्यावर चपराकच बसली. यावेळी ओबामा निश्चित लोकशाहीवादी भूमिका घेईल ही अपेक्षा होती, तसे झाले नाही. इजिप्त, ट्युनिशियात लोकशाही आली पण त्या अमेरिकाधार्जिण्या नाहीत. इराणशी वैमनस्य तीव्र होत आहे. अगदी आजवरचे लाडावलेले बाळ इस्रायलही दुरावला आहे. क्लिंटनबाईंनी अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरण 'गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले' या स्थितीला आणले आहे. ओबामांचा कृष्णवर्ण, चांगले वक्तृत्व हा करिष्मा देशांतर्गत मते मिळवायला परत थोडाफार उपयोगी पडला पण नेतृत्वच नसल्याने इतरत्र त्याचा परिणाम शून्य.

दुसरा सत्तापालट किंवा खांदेबदल चीनमध्ये झाला. तो दोन महत्त्वाच्या प्रक्रियांच्या पार्श्वभूमीवर झाला. एक म्हणजे तेथील नेतृत्वातील घराणेशाहीचा उदय. या नव्या नेतृत्वाला चीनमध्ये हेटाळणीने 'राजपुत्र' म्हटले जाते. आपल्याकडच्या राहुल गांधी, ज्योतिरादित्य शिंदे, सचिन पायलट, ओमार अब्दुल्ला अशी ही मंडळी. माओच्या लाँग मार्चमधले सहकारी, नंतरच्या 'सांस्कृतिक क्रांती'तील कैदी वगैरेंचे हे वंशज. ही पिढीही आता साठीत आहे पण चिनी नेतृत्वाच्या दृष्टीने तरुण मानली जाते. त्यांचे सत्तेशी संबंध वडिलोपार्जित आहेत व लष्कराशीही घनिष्ट संबंध आहेत.

दुसरी प्रक्रिया भ्रष्टाचाराची. बो झिलाई (Bo Xilai) या अशाच एका 'राजपुत्राचे' व त्याच्या पत्नीचे आर्थिक हितसंबंध, त्यादरम्यान

एका ब्रिटिश हस्तकाचा खून इत्यादी प्रकरण प्रतिमेच्या दृष्टीने सरकारला चांगलेच महागात गेले. झिलाईची पत्नी आता तुरूंगात खडी फोडते आहे. तिने पोटॅशियम सायनाईड पाजून त्या ब्रिटिशाचा खून केला हा आरोप 'मान्य' केला. बो झिलाई कारवाईच्या प्रतीक्षेत सरकारने अज्ञातस्थळी अडकवला आहे. चोंगकिंग या प्रांताचा बो गव्हर्नर होता व या खांदेपाटलात पॉलिटब्युरोत वरचे स्थान मिळायलाही उत्सुक होता. त्याला आता पक्षातूनच बाहेर काढण्यात आले आहे आणि त्याची नामोनिशाणीही सरकारी दस्तऐवजातून नष्ट करण्यात येत आहे. विकासाच्या केंद्र सरकारच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रारूपाला त्याने आव्हान दिले. राज्याने उद्योगात गुंतवणूक करण्याचे प्रारूप, गुन्हेगारीचा बंदोबस्त व माओवादाकडे परत वाटचाल हा प्रयोग त्याच्या प्रांतात यशस्वी करून दाखवला. म्हणून त्याचा राजकीय बळी या खांदेपालटाआधी घेण्यात आल्याची शक्यता आहे.

विद्यमान पंतप्रधानाचे नातलग व मित्रमंडळी यांनी तो पंतप्रधान झाल्यापासून करोडो डॉलर्सची संपत्ती मिळवल्याचे शोधलेख न्यूयॉर्क टाईम्सने प्रसिद्ध केले. हा पंतप्रधान आपण गरीब घरातून, खेड्यातून आल्याची कायम आठवण करून देत असे. हा अहवाल प्रसिद्ध होताच सरकारने न्यूयॉर्क टाईम्सच्या इंटरनेट आवृत्तीवर चीनमध्ये बंदी घातली आणि हा देशाची प्रतिमा डागाळण्याचा 'परकीय शक्तींचा' डाव आहे अशी हाकाटी सुरू केली.

नवनियुक्त अध्यक्ष मार्चमध्ये सूत्रे हातात घेईल. तोही अशा राजपुत्रांपैकी एक आहे.

मुळात आपल्या अनिर्वाचित राज्यव्यवस्थेत सत्तापालट कसा सुरळित होतो हे स्वत:च्या नागरिकांना व जगाला दाखवण्यासाठी हा दशवार्षिक कार्यक्रम होता. त्याची झळाळी या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांनी चांगलीच कमी झाली. एकूण या सत्तापालटाने चीनचे अंतर्गत किंवा परराष्ट्रीय धोरण बदलेल असे दिसत नाही. आर्थिक वाढीचा दर वाढवणे या एकमेव उद्दिष्टासाठी देशांतर्गत प्रदूषण चालू राहील; दक्षिण अमेरिका, आफ्रिका येथील कच्च्या मालाची आयात चालूच राहील. त्यासाठी तिथला निसर्ग व समाज किंमत मोजेल. तिबेट, वीघर हे प्रांत तसेच मुस्लिम अल्पसंख्याक यांच्यावरचे दमनचक्र, कामगारांचे शोषण, जपानबरोबरचा कमी तीव्रतेचा पण सततचा संघर्ष हेही चालूच राहतील.

थोडक्यात, दगडापेक्षा वीट मऊ या कसोटीवरील ओबामांची निवड अथवा नव्या बाटलीत जुनी दारू हा चीनमधील सत्तापालट यात जगाच्या दृष्टीने फारसे आशादायक काही नाही.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*